मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | सोमवार, दि. 23 जून 2025 | पान- 1


# सवलतींचा लाभ घेण्याचे महानगरपालिकेचे आवाहन

## 30 जून 2025 पूर्वी मालमत्ता कर भरल्यास 10 टक्के सवलत : 1 जूलै पासून 2 टक्क्यांचा विलंब दंड लागणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी विविध सवलती जाहीर केल्या असून त्या मिळविण्यासाठी आता केवळ १० दिवस बाकी आहेत. ३० जून २०२५ पूर्वी ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरल्यास १० टक्के सवलत असून महिलांच्या नावावर असलेल्या एका मालमत्तेसाठी ३० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात आहे. मालमत्ताधारकांनी सदर सवलतींचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

महानगरपालिकेने 'सिद्धी उपक्रम' अंतर्गत महिला बचत गटांमार्फत ६ लाख ३५ हजार मालमत्ता धारकांना घरोघरी जाऊन बिलांचे वाटप केले आहे. त्याचसोबत अनेक मालमत्ता धारकांना जप्तीच्या नोटीसा देखील पाठवण्यात आल्या असून, लवकरच जप्तीची कारवाईही केली जाणार आहे. सदर मोहिमेमुळे एप्रिल ते १९ जून दरम्यान महापालिकेला ३५९ कोटी ८५ लाख रुपयांचा मालमत्ताकर संकलित झाला आहे.

दरम्यान, २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये थकबाकीदारांकडून प्राप्त झालेल्या धनादेशांपैकी न वटलेल्या धनादेशाची एकूण कराची रक्कम १० कोटी १५ लाख रुपये आहे. ज्या मालमत्ताधारकांचा धनादेश वटला नाही, अशा मालमत्ताधारकांना नोटीस देत त्यांना त्यांची रक्कम रोख व ऑनलाइन माध्यमातूनच भरावी लागेल, असे महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




### खासगी शैक्षणिक संस्थांसाठी या आहेत सवलती !

- "माझी मिळकत माझी आकारणी" योजनेअंतर्गत नोंदणीकृत मालमत्तेस – ६९% सवलत
- नवीन आकारणी झालेल्या मालमत्तेस – ५% सवलत
- सलग ३ वर्षे नियमित कर भरणाऱ्यास – २% सवलत
- एप्रिल ते जून दरम्यान ऑनलाईन एकरकमी भरणाऱ्यास – ५% सवलत
- माजी सैनिक, शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांसाठी – १००% सवलत
- इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनला – २% सवलत

### अशा आहेत सवलती !

- ३० जूनपर्यंत लागू असणाऱ्या सामान्य सवलती
- स्वातंत्र्यसैनिक किंवा पत्नीच्या नावावरच्या एका निवासी मालमत्तेस – ५०% सवलत
- महिलांच्या नावावरच्या एका निवासी मालमत्तेस ३०% सवलत
- ४०% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तीच्या एका मालमत्तेस ५०% सवलत
- संपूर्ण कराची रक्कम आगाऊ भरणाऱ्यास ५% सवलत

> नागरिकांनी वेळेवर आणि प्रामाणिकपणे मालमत्ता कर भरल्यास महापालिकेला शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण यामध्ये आणखी सुधारणा करता येते. या पार्श्वभूमीवर दिल्या जाणाऱ्या सवलती म्हणजे वेळेवर कर भरणाऱ्यांचा सन्मान आहे. नागरिकांनी ३० जूनपूर्वी कर भरून या सवलतींचा लाभ घ्यावा आणि शहराच्या विकासात योगदान द्यावे.
>
> - प्रदीप जांभळे पाटील ,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका

# मोदीजींचे कार्य हे खऱ्या अर्थाने देशाच्या प्रगतीचा आधारस्तंभ : शत्रुघ्न काटे

## पंतप्रधान मोदींच्या 11 वर्षांच्या कार्यकाळावर आधारित 'मोदी@11' प्रदर्शनाचे उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळाला समर्पित 'मोदी@11' अभियानांतर्गत 'विकसित भारताचा अमृत काळ: सेवा, सुशासन, गरीब कल्याण' या विषयावरील तीन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन आज भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते पार पडले. भाजप युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा सरचिटणीस अजय पाताडे यांच्यावतीने ग. दि. माडगूळकर प्रेक्षागृह, प्राधिकरण, निगडी येथे हे तीन दिवसीय प्रदर्शन भरविण्यात आले.

या प्रदर्शनात पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत केलेल्या विकासकामांचे, लोककल्याणकारी योजनांचे आणि सुशासनाचे पैलू मांडण्यात आले आहेत. यामध्ये सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण यावर विशेष भर देण्यात आला आहे.

यावेळी शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत देशाच्या विकासासाठी आणि लोककल्याणासाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. 'सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण' या त्रिसूत्रीवर आधारित मोदीजींचे कार्य हे खऱ्या अर्थाने देशाच्या प्रगतीचा आधारस्तंभ आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून जनतेला केंद्र सरकारच्या विविध योजनांची आणि धोरणांची सविस्तर माहिती मिळेल. 'मोदी@11' हे अभियान केवळ एक प्रदर्शन नाही, तर ते पंतप्रधान मोदींच्या दूरदृष्टीचे, त्यांनी देशासाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे आणि सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याच्या त्यांच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी मोदीजींनी टाकलेले प्रत्येक पाऊल हे देशाच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे आहे," असे त्यांनी सांगितले.




या उद्घाटन सोहळ्याला आमदार महेश लांडगे, माजी खासदार अमर साबळे, माजी उपमहापौर शैलेजा मोरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, चंद्रकांत नखाते, महेश कुलकर्णी, माऊली थोरात, सरचिटणीस अजय पाताडे, संजय मंगोडेकर, विलास मडेगिरी, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी नगरसेविका शर्मिला बाबर, राजेंद्र बाबर, मंडल अध्यक्ष जयदीप खापरे, हर्षल नढे, गणेश ढोरे, मंगेश धाडगे, शिवराज लांडगे, रामदास कुटे, अनिता वाळुंजकर, संजय परळीकर, संजय भिसे, दिनेश यादव, विजय शिनकर, सलीम शिकलगार, रवी देशपांडे, बिभीषण चौधरी, कैलास कुटे,अरुण चाबुकस्वार,राजू मासुळकर, मनोज ब्राह्मणकर, शशिकांत पाटील, देविदास साबळे, गोरक्षनाथ झोळ, खंडूदेव कठारे, महादेव कवितके, संतोष ठाकूर, अभिजित बोरसे, आर.एस.कुमार, गणेश वाळुंजकर, समीर जावळकर, सचिन राऊत, अमेय देशपांडे, भूषण जोशी यांच्यासह इच्छुक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे प्रदर्शन २२ जून २०२५ ते २४ जून २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

# पाणी मीटर बिलाची भीती घालवण्यासाठी पालिकेचा अनोखा प्रयोग

## डमी पाण्याचे बिल पाठवणार, प्रस्ताव अतिरिक्त आयुक्तांसमोर सादर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेकडून शहरासह उपनगर भागात समान पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पाणी मीटर बसवण्याचे काम देखील सुरु आहे. परंतु पाण्याच्या बीलाची भीती वाटत आहे. त्यामुळे त्यांना आपण पाणी किती वापरतो आणि त्यानंतर बील किती येते हे समजण्यासाठी 'डमी पाणी बिल' पाठवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. हा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्तांसमोर सादर करण्यात आला असून या प्रस्तावाला अंतिम मान्यता पालिका आयुक्तांची मिळाल्यानंतर डमी बिल नागरिकांना पाठवली जातील. परंतु हे बिल नागरिकांनी भरावे लागणार नाही. केवळ ही एक चाचणी असेल असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.



### असे आहे पाण्याचे गणित

- » महापालिकेला एक लिटर पाण्यासाठी २२ पैसे खर्च येतो.
- » घरगुती पाणी मीटरसाठी १ लिटरसाठी ८ पैसे
- » व्यावसायिक पाणी मीटरसाठी १ लिटरसाठी ६० ते ६५ पैसे आकारण्याचा विचार

समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शहरात नवीन मीटर बसवण्याचे काम वेगाने सुरू आहे. ज्या ठिकाणी या योजनेनुसार पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली आहे, तसेच जून्या लाईनला सुमारे अडीच लाख पाणी मीटर बसविण्यासचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी सध्या १ लाख ८० हजार पाणी मीटर बसविण्यात आले आहेत. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता पालिकेला मिळणारा पाण्याचा कोटा आपुरा आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी पालिकेला मोठी कसरत करावी लागत आहे. या योजनेच्या माध्यमातून समान पाणी देण्याचे उद्दिष्ट पालिकेने ठेवले आहे. पालिकेकडून सातत्याने पाणी जपून वापरण्याचे आवाहन नागरिकांना केले जात आहे. त्यानंतरही मात्र पाण्याचा अतिवापर होत असल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांना शिस्त लागावी, पाण्याचा अतिरिक्त वापर होऊ नये, तसेच पाण्यासाठी पैसे मोजण्याची मानसिकता निर्माण करण्यासाठी पाणी मीटरनुसार बिल आकारणी केली जाणार आहे. पाण्याचे बील जर स्वतंत्र दिले तर किती पैसे द्यावे लागतील, याची माहिती या डमी बिलाच्या माध्यमातून येणार आहे. तर मिळकत करात पाण्याचे बिल दिल्यास मिळकतकरात किती वाढ होईल, याचाही अंदाज येणार आहे, त्यामुळे ही डमी बिलाची संकल्पना पुढे आणली आहे. नागरिकांना महिन्याला बिल द्यावे की वर्षाला याचाही विचार केला जाणार आहे, असे पाणी पुरवठा विभागाने सांगितले.

> नागरिकांना आपण किती पाणी वापरतो हे समजावे आणि मीटरनुसार येणाऱ्या बिलाची सवय व्हावी, या हेतूने हे डमी बिल पाठवले जाईल. यातून पाणी वापराबाबत जनजागृती साधली जाईल. डमी बिल इ-मेलद्वारे तसेच व्हॉट्सअपवर पाठवले जाईल. त्यामुळे यासाठी वेगळा खर्च करण्याची गरज नाही. या संकल्पनेला अद्याप मान्यता मिळालेली नाही.
>
> - नंदकिशोर जगताप, प्रमुख, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका.

दरम्यान, पालिका आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर ही डमी बिले पाठवण्यास सुरुवात केली जाईल. यामुळे नागरिकांना मीटरद्वारे नोंदवल्या जाणाऱ्या वापराची अचूक माहिती मिळेल. प्रत्यक्ष बिल आकारणी सुरू करण्यापूर्वी, नागरिकांना त्यांच्या पाणीवापराची आणि मीटरप्रमाणे येणाऱ्या बिलाची माहिती व्हावी, हा उद्देश या मागे आहे.

या योजनेद्वारे शहरात निवासी आणि व्यावसायिक अशा एकूण सुमारे ३ लाखाचे उद्दिष्ट होते. परंतु दुहेरी कनेक्शन याचा विचार करुन ते २ लाख ५० हजार पाणी जोड पर्यंत जाईल. या संपूर्ण प्रक्रियेसाठी एक ऑनलाइन प्रणालीदेखील विकसित करण्यात आली आहे. या माहितीपूर्ण बिलांमुळे नागरिक पाणी जपून वापरतील आणि पर्यायाने पाण्याची बचत होण्यास मदत होईल. या डमी बिलाची रक्कम नागरिकांना प्रत्यक्षात भरावी लागणार नाही. हे बिल केवळ माहितीसाठी असणार आहे, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या पाणी वापराच्या सवयींबद्दल जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल. असा दावा पाणीपुरवठा विभागाने केला आहे.

# 'संवाद वारी'चे मंत्री जयकुमार गोरेंच्या हस्ते उद्घाटन

## राज्य शासनाच्या योजनांची-उपक्रमांची वारकऱ्यांना मिळणार माहिती...

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ठळक लोककल्याणकारी योजना, उपक्रमांची माहिती देणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मार्फत आयोजित 'संवाद वारी'या चित्र प्रदर्शनाचे, एलइडी व्हॅन कलापथक व्हॅन तसेच चित्ररथाचे राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.




विधानभवनाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर आदी उपस्थित होते.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा तसेच श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हे प्रदर्शन ठेवण्यात येणार असून मुक्काम तळांसोबत संपूर्ण मार्गावर चित्ररथ, कलापथक तसेच एलइडी व्हॅनच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती करणार आहेत.

प्रदर्शनात ३० फ्लेक्स पॅनेलचा समावेश आहे. पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्डची सुविधा पशुपालकांना देणे, पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकासाला चालना, बळीराजा शेतकऱ्याच्या उन्नतीसाठीच्या योजना व घेतलेले निर्णय, नागरिकांना भेसळविरहित अन्नधान्य मिळावे यासाठी सुरक्षित अन्न तपासणीच्या सुविधा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी योजनांच्या लाभासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, 'महाविस्तार- एआय' ॲप, सायबर सुरक्षितता, जलसिंचनासाठीचे प्रकल्प, सामाजिक न्यायासाठी मंत्रालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापना, तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना, आदिवासींच्या उत्थानासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना, प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत ३० लाख घरे मंजूर, पीएम- जनमन, रमाई, शबरी, अटल बांधकाम कामगार वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली आहे.

# देहू ते पंढरपूर या मार्गावर महापालिकेकडून "सुरक्षित वारी, अखंड सेवा!"

## लाखो वारकऱ्यांची श्रद्धास्थान असलेला संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहू ते पंढरपूर या मार्गावर सुरु झाला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

लाखो वारकऱ्यांची श्रद्धास्थान असलेला संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहू ते पंढरपूर या मार्गावर सुरु झाला आहे. "सुरक्षित वारी, अखंड सेवा!" या भावनेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज झाले आहेत.

महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि अग्निशमन विभागाचे प्रमुख मनोज लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, वारीदरम्यान अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग अहोरात्र सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर, वारी मार्गावर उच्चतम दक्षतेसह नियोजन करण्यात आले असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये, यासाठी आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करण्यासाठी ७७५७९९६०४ हा क्रमांक महापालिकेने जारी केला आहे.

वारीच्या काळात सुरक्षिततेचे सर्व नियम पाळावेत. विजेच्या तारा, गॅस सिलिंडर किंवा आगीपासून दूर रहावे, आणि कोणतीही आपत्तीजनक परिस्थिती दिसल्यास तत्काळ वरील क्रमांकांवर माहिती द्यावी, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून सर्व वारकऱ्यांना व नागरिकांना करण्यात आले आहे.

अग्निशमन विभागाचा कंट्रोल रूम वारी दरम्यान घटनेच्या माहितीवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज करण्यात आलेला आहे. वारी मार्गावरील स्थानिक पोलीस, आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि स्वयंसेवी संस्था यांच्यासोबत निरंतर समन्वय साधला जाईल.

महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि अग्निशमन विभागाचे प्रमुख मनोज लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, वारीदरम्यान अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग अहोरात्र सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. लाखो वारकऱ्यांची श्रद्धास्थान असलेला संत तुकाराम महाराज पालखी सोहळा देहू ते पंढरपूर या मार्गावर सुरु झाला आहे. "सुरक्षित वारी, अखंड सेवा!" या भावनेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज झाले आहेत.




### संबंधित ठेकेदारांकडून खड्डे भरून घेणार

» ७ सदस्यांची विशेष प्रशिक्षित टीम वारी दरम्यान नेमण्यात आली आहे. या टीममध्ये अनुभवी अग्निशमन अधिकारी, चालक व जवान यांचा समावेश आहे.

» टीमसोबत फायर टेंडर (अग्निशमन गाडी), वॉटर टँकर, प्राथमिक उपचार किट, बचाव साहित्य (लाईफ रोप्स, स्ट्रेचर, कटर मशीन, पंप्स), तसेच जनरेटर आणि लाइटिंग सिस्टीम सुसज्ज स्वरूपात उपलब्ध आहे.

» ही टीम पालीखीच्या मार्गावर दररोज मुक्कामी ठिकाणी २४x७ उपस्थित राहते.

### नियंत्रण आणि समन्वय

» अग्निशमन विभागाचा कंट्रोल रूम वारी दरम्यान घटनेच्या माहितीवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज करण्यात आलेला आहे.

» वारी मार्गावरील स्थानिक पोलीस, आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि स्वयंसेवी संस्था यांच्यासोबत निरंतर समन्वय साधला जाईल.

### नागरिकांसाठी सूचना व मदत क्रमांक

» वारीच्या मार्गावर कोणतीही अग्नितत्वाशी संबंधित आपत्ती, अपघात, शॉर्टसर्किट, अशा घटना घडल्यास ताबडतोब खालील क्रमांकावर संपर्क साधावा: पिंपरी चिंचवड अग्निशमन नियंत्रण कक्ष: ७७५७९९६०४

# पावसाने दाणादाण; पिंपरी-चिंचवड शहर, उपनगरसह मावळात जनजीवन विस्कळीत

## पिंपरी-चिंचवड शहरासह उपनगरांत दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे दाणादाण उडाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासह उपनगरांत दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे दाणादाण उडाली आहे. बहुतांश रस्त्यांवर पाणी साचले आहे. यामुळे जलमय रस्त्यातून मार्ग काढताना पादचाऱ्यांसह वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पावसाळ्यापूर्वीच रस्त्यातील खड्डे, धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी, महावितरणने डीपी बॉक्स, भूमिगत केबल यांची देखभाल दुरुस्तीचे कामे न केल्याने यावर्षी उद्योगनगरीतील नागरिकांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे स्पाईन रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने पादचाऱ्यांसह वाहनचालकांना प्रवास करताना अडथळा येत आहे. स्पाईन रोड ते आरटीओकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंतच्या भागात निगडीकडून भोसरीकडे जाणाऱ्या रस्त्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहत आहे.

स्पाईन रोडवरील पाण्याचा निचरा होण्यासाठी स्टॉर्मवॉटर लाईन आहे. परंतु, चेंबर रस्त्यापेक्षा वर किंवा चढावरती असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. जाधव सरकार चौकात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने येथे तळ्याचे स्वरूप आले आहे. यामुळे येथून प्रवास करताना वाहनचालकांना अडचण येत आहे. या चौकात मागील पंधरा दिवसांपूर्वी रस्ता खोदाई केली आहे. यावर अद्याप डांबरीकरण करण्यात आलेले नाही, यामुळे वाहतुकीस अडथळा येत आहे.

भोसरी एमआयडीसीतील महत्त्वाच्या रस्त्यांवरदेखील मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने वाहतुकीस अडथळा येत आहे. चिखली, कुदळवाडी परिसरात रस्त्यांची कामे सुरू आहेत. यामुळे या रस्त्याने प्रवास करताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



### सम्राट चौकात तुंबले ड्रेनेज

» महापालिका आयुक्तांच्या निवासस्थानाकडे जाताना सम–ाट चौक लागतो. या चौकातून गेलेली ड्रेनेजलाईन दरवर्षी पावसात ओव्हरफ्लो होते. यंदादेखील अवकाळी पावसाने येथील ड्रेनेजलाईनचा चेंबरमधून मोठ्या प्रमाणावर मैलामिश्रित दूषित पाणी रस्त्यावर वाहत होते. परंतु, महापालिका प्रशासन येथील ड्रेनेजलाईन तुंबू नये, यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करत नसल्याने बुधवारपासून शहरात सुरु असलेल्या पावसामुळे येथील ड्रेनेज पुन्हा ओव्हरफ्लो झाले आहे. महापालिका आयुक्त दररोज या मार्गाने ये जा करतात, त्याच मार्गावर ड्रेनेजलाईन साफसफाईची ही अवस्था आहे. तर शहरातील स्वच्छता आणि नालेसफाईबाबत नागरिकांत प्रश्न निर्माण होत आहे.

# भीमा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या बाजूला भगदाड

**भीमा नदीवर वाहून आलेल्या जलपर्णी, झाडांच्या फांद्या, प्लास्टिक च्या पिशव्या वेळोवेळी न काढत बंधाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यानेच भगदाड पडले असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले.**

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा – पेरणे या दोन गावांदरम्यान भीमा नदीवर असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याला पेरणे बाजूला बघदाड पडून आजूबाजच्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाटबंधारे खात्यावर संताप व्यक्त केला आहे.

भीमा नदीवर वाहून आलेल्या जलपर्णी, झाडांच्या फांद्या, प्लास्टिक च्या पिशव्या वेळोवेळी न काढत बंधाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यानेच भगदाड पडले असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले. मागील महिन्यापासून होत असलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

अशातच आता या आठवड्यात झालेल्या पावसाने पाणी बंधाऱ्यावरून न जाता पेरणे बाजूने गेल्याने बंधाऱ्याची कडा वाहून गेल्याने नदीकाठावर मोठे भगदाड पडले आहे. बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस पेरणे, डोंगरगाव, डिंग्रजवाडी,कोरेगाव भीमा, पिंपरी सांडस सह अनेक गावांच्या नदीकाठावरील विद्युत पंप वाहून गेल्याचे बोलले जात आहे.

भगदाडामुळे आजूबाजूंच्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्याचा त्वरित पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अतितातडीची मदत मिळावी. यासाठी शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याकडे मागणी केली आहे.

दरम्यान पेरणे बाजूला बंधाऱ्याला पडलेल्या भगदाडावर वेळीच उपाययोजना केली नाही, तर मोठी हानी होणार असल्याची शक्यता नदीकाठावरील गावांतील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस पेरणे, डोंगरगाव, डिंग्रजवाडी,कोरेगाव भीमा, पिंपरी सांडस सह अनेक गावांच्या नदीकाठावरील विद्युत पंप वाहून गेल्याचे बोलले जात आहे कोरेगाव भीमा ग्रामपंचायत च्या वतीने 27 मे 2025 रोजी पाटबंधारे विभागाला पत्र व्यवहार करण्यात आला होता. पाटबंधारे विभागाने या पत्राला संवेदनशीलता आणि कार्यतत्परता दाखवायला हवी होती. कोरेगाव भीमा – पेरणे या दोन गावांदरम्यान भीमा नदीवर असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याला पेरणे बाजूला बघदाड पडून आजूबाजच्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाटबंधारे खात्यावर संताप व्यक्त केला आहे.



### नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी

» पाटबंधारे खात्याच्या निष्काळजी पणामुळे कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्या लगत पडलेल्या भगदाडामुळे आजूबाजूंच्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्याचा त्वरित पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अतितातडीची मदत मिळावी. यासाठी शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याकडे मागणी केली आहे.

> कोरेगाव भीमा ग्रामपंचायत च्या वतीने 27 मे 2025 रोजी पाटबंधारे विभागाला पत्र व्यवहार करण्यात आला होता. पाटबंधारे विभागाने या पत्राला संवेदनशीलता आणि कार्यतत्परता दाखवायला हवी होती. संबंधित विभागाने वेळेत दुरुस्ती केली असती तर आज ही वेळ आली नसती. बंधारा फुटल्याने पेरणे बाजूला असणारा भीमा नदी काठ मोठ्या प्रमाणात कोरला गेला आहे. प्रशासनाने तातडीने नवीन बंधारा बांधून देत भविष्यातील नागरिकांचे व उद्योगधंद्यांचे नुकसान टाळावे.
>
> - संदीप ढेरंगे, सरपंच कोरेगाव भीमा

> संबंधित कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची की वॉल पावसाच्या पाण्याच्या दाबाने वाहून गेली असून सदर दुरुस्ती युद्ध पातळीवर करण्यात येणार आहे. याबाबत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
>
> - राजाराम आहेर, शाखा अधिकारी – कोंढापुरी पाटबंधारे शाखा

# अतिवृष्टीमुळे बटाटा बियाणे घरातच सडण्याची शक्यता

**आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात गेली पंधरा ते वीस दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकरी चिंतेत असून पेरलेली शेती संकटात**

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात गेली पंधरा ते वीस दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकरी चिंतेत असून पेरलेली शेती तर संकटात आहेच. परंतु बटाटा लागवड करण्यासाठी आणलेले बियाणे घरात पडून सडण्याची शक्यता आहे.

काही शेतकऱ्यांनी तर बटाटा बियाणे चिरून ठेवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते.

संपूर्ण मे महिना तसेच जून अर्ध्याच्या वर संपला तरी पाऊस उघडीप घेत नसल्याने प्रचंड मोठे संकट शेतकऱ्यावर ओढवण्याची शक्यता आहे.

शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी परिसरातील पोंदेवाडीचे माजी सरपंच अनिल वाळुंज,शिरदाळे सरपंच मनोज तांबे,पहाडदरा सरपंच मच्छिंद्र वाघ,धामणी सरपंच रेश्मा बोऱ्हाडे यांनी केली आहे. शिरदाळे परिसरात काही वर्षांपूर्वी बटाटा लागवड मोठ्या प्रमाणात होत होती. पर्यंत गेल्या काही वर्षात बटाटा लागवड कमी झाली आहे. यंदा देखील ही लागवड घटणार होती. परंतु अनेक शेतकऱ्यांनी बटाटा बियाणे आणून घरात ठेवले आहे.

पंधरा दिवसांपासून बियाणे घरात पडून आहे. तर काही शेतकऱ्यांनी बटाटा लागवड केली आहे. परंतु सततच्या पावसाने कसलीच शाश्वती नसल्याचे शिरदाळे येथील बटाटा उत्पादक शेतकरी बाबाजी चौधरी,संदीप मिंडे,राघू रणपिसे,बाळासाहेब तांबे,सुरेश तांबे,केरभाऊ तांबे,कांताराम तांबे या शेतकऱ्यांनी सांगितले. तर पेरणी केलेली सोयाबीन,वाटाणा,मूग,उडीद,मका या पिकांची अवस्था बिकट असून कदाचित दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते असे शिरदाळे उपसरपंच बिपीन चौधरी, माजी उपसरपंच मयुर सरडे गणेश तांबे यांनी सांगितले.

आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात गेली पंधरा ते वीस दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकरी चिंतेत असून पेरलेली शेती तर संकटात आहेच. परंतु बटाटा लागवड करण्यासाठी आणलेले बियाणे घरात पडून सडण्याची शक्यता आहे.



### प्रक्रियेमुळे बियाणे खराब होण्याची भीती

» गेल्या १५ दिवसांपासून शेतकऱ्यांनी बटाटा बियाणे घरात आणून टाकले आहे. काही शेतकऱ्यांनी बियाणे चिरून ठेवले आहे. तर त्यासाठी लागणारे रासायनिक खते देखील आणून ठेवली आहेत. त्यामुळे जसे दिवस जात आहेत, तसे बियाणे सडत असून मोठं नुकसान होत आहे. शेतकरी चिंतेत आहे. पाऊस थांबला नाही तर दुबार पेरणीचे संकट उभे राहणार असून पुन्हा पेरणी परवडणार नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.